पुणे, शनिवार, ९ डिसेंबर २०२३ ५

पुढारी @www.pudhari.com pudhari

## संक्षिप्त



बालेवाडी येथे सायकल स्पर्धेचे उद्घाटन करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, ॲड. राजमाला बुट्टे पाटील.

# आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धा संपन्न

**राजगुरुनगर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. ७) शिवछत्रपती क्रीडासंकुल बालेवाडी येथे आंतरविभागीय ट्रॅक सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत पुणे शहर, पुणे जिल्हा, अहमदनगर आणि नाशिक अशा चारही विभागांतून आलेल्या सुमारे २४ सायकलिंग खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेतून निवडला जाणारा संघ हा अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेचे उदघाटन प्रदेश महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपाध्यक्षा ॲड.राजमाला बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. दीपक माने, सदस्य शिवाजी उत्तेकर, महाराष्ट्र राज्य सायकलिंग प्रशिक्षक दिपाली निकम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय सातपुते, उत्तम नाळे, सुनील प्रसाद, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्रबंधक कैलास पाचरणे आदी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रतिमा लोणारी यांनी परिश्रम घेतले.